Peer Reviewed Refereed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – XIV Issue – II March - April 2025

# निपुण भारत अभियानांतर्गत पायाभुत साक्षरता आणि संख्याज्ञान (FLN) ची अंमलबजावणी करताना येणा–या समस्या, उपाययोजना आणि परिमाणकारकता अभ्यासणे

संशोधकाचे नाव
श्रीम. अनुराधा संदिपान ढोरमारे
*मातोश्री आसराबाई दराडे महिला शिक्षणशास्त्र महाविदयालय*
*यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ*
*अभ्यासकेंद्र येवला 54499*

मार्गदर्शकाचे नाव
प्रा. ज्योती मोरे
*एमए, एमएड, सेट*
*मातोश्री आसराबाई दराडे महिला शिक्षणशास्त्र महाविदयालय*
*यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ*
*अभ्यासकेंद्र येवला 54499*

*सारांश*

*आपल्या भारतामध्ये अनेक शैक्षणिक धोरणे, विविध प्रकारचे शैक्षणिक आयोग अस्तित्वात आहेत. प्रत्येक शैक्षणिक धोरणात आणि आयोगामध्ये प्राथमिक शिक्षणापासुन ते उच्च शिक्षणापर्यंत अनेक तरतुदी केलेल्या आहेत. त्यातील नाविन्यपुर्ण बाब म्हणजे छम्च 2020 नुसार आपल्या शिक्षण क्षेत्रामध्ये एक नविन शिक्षणप्रणाली समाविष्ट झाल्याचे दिसुन येत आहे. **NEP** 2020 नुसार विद्यार्थ्यांमध्ये पायाभुत साक्षरता आणि संख्याज्ञान रूजविणे हे एक उदिदष्ट सांगितलेले आहे. या अनुषंगाने निपुण भारत अभियानाअंतर्गत पायाभुत साक्षरता व संख्याज्ञान; थ्स्छ द्ध अभियानाची अंमलबजावणी सुरू आहे.*

*शाळेत येणा–या प्रत्येक विद्यार्थ्याला इयत्तानुरूप वाचन क्षमता विकसीत होणे, विद्यार्थ्यास इयत्तानुरूप गणितीय क्रिया करता येणे अभिप्रेत आहे. अपेक्षित क्षमता अप्राप्त असलेल्या विद्यार्थ्यांना उपचारात्मक अध्यापनाने, मार्गदर्शनाने अपेक्षित क्षमता प्राप्ती करून देणे गरजेचे आहे.*

cc BY *Global Online Electronic International Interdicipilinary Research Journal's* licensed Based on a work at *http://www.goeiirj.com*

**महत्वाचे शब्द** : पायाभुत साक्षरता, संख्याज्ञान, NIPUN, FLN

## संशोधन विषयाची ऐतिहासिक पार्श्वभुमी

## निपुण भारत अभियानाचा प्रारंभ

भारत सरकारच्या शिक्षण मंत्रालयाने 5 जुलै 2021 रोजी निपुण भारत अभियानाची घोषणा केली. या अभियानाचा उददेश 2026–27 पर्यंत प्राथमिक स्तरावरच्या मुलांना वाचन, लेखन आणि संख्याज्ञान कौशल्यामध्ये सक्षम करणे आहे. हा कार्यक्रम राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020 (NEP

2020) अंतर्गत सुरू करण्यात आला.

**FLN पायाभुत साक्षरता आणि संख्याज्ञान आणि त्याचा ऐतिहासिक विकास**

1 **शिक्षणाचा पाया**

शैक्षणिक अभ्यासानुसार मुलभुत साक्षरता आणि संख्याज्ञान म्हणजे प्राथमिक शिक्षणाचा आधार.

वाचन, लेखन आणि मुलभुत गणित समजणे हे पुढील शिक्षणाच्या यशासाठी अनिवार्य आहे.

2 **राष्ट्रीय शिक्षण धोरण 1986 आणि 1992**

या धोरणामुळे सर्वांसाठी शिक्षण हा मुलभुत उददेश ठेवण्यात आला. परंतु मुलभुत साक्षरता आणि संख्याज्ञान यावर फारसा भर नव्हता.

3 **सर्व शिक्षा अभियान ( SSA ) 2001**

सर्व शिक्षा अभियानामुळे प्राथमिक शिक्षणाचा प्रसार झाला, परंतु गुणवत्तेचा अभाव दिसुन आला तसेच ग्रामिण आणि शहरी भागातील विद्यार्थ्यांमधील शिक्षणाचा स्तर समान नव्हता.

4 **ASER अहवाल.**

2005 पासुन जारी करण्यात आलेल्या वार्षिक स्थिती अहवालांनी Annual Status Of Education Report-

ASER दाखवले की, भारतातील अनेक विद्यार्थ्यांना वाचन , लेखन आणि गणिताचे मुलभुत कौशल्य आत्मसात करण्यात अडचणी येतात.

उदा 2018 च्या अहवालानुसार ग्रामीण भागातील 50% विद्यार्थ्यांना दुसऱ्या स्तराचे वाचन करता येत नव्हते.

5) NEP 2020 राष्ट्रीय शिक्षण धोरण

NEP 2020 ने पहिल्यांदाच FLN ला शिक्षणाच्या प्राथमिक टप्प्यावर प्राधान्य दिले. शिक्षण धोरणात 3 ते 9 वयोगटातील मुलांच्या सक्षमता आधारित शिक्षण पध्दतीला महत्व दिले.

6 समग्र शिक्षा अभियान

समग्र शिक्षा अभियान (2018) अंतर्गत (FLN) उदिदष्टे समाविष्ट करण्यात आली, ज्यामध्ये विद्यार्थ्यांच्या संपुर्ण विकासासाठी उपाययोजना सुचवण्यात आल्या.

निपुण भारत अभियानाचा प्रवास

दृष्टिकोन

निपुण भारत अभियानाने सर्व मुलांनी 2026–27 पर्यंत वयाच्या 9 व्या वर्षांपर्यंत कौशल्ये आत्मसात करावीत हा स्पष्ट उददेश ठेवला आहे.

पंचसुत्री उदिदष्टे

- बालमित्र आणि आनंददायक शिक्षण
- बहुभाषिक शिक्षण पध्दतीचा स्विकार
- शिक्षक प्रशिक्षणात सातत्य
- शिक्षण तंत्रज्ञानाचा वापर
- समुदाय आणि पालकांचा सहभाग वाढवणे

**FLN** चे महत्व

हे केवळ मुलांसाठी शैक्षणिक पायाभुत कौशल्य निर्माण करण्यासाठीच महत्त्वाचे नाही तर देशाच्या आर्थिक आणि सामाजिक विकासासाठीही आवश्यक आहे. निपुण भारत अभियानाच्या माध्यमातुन **FLN** च्या ऐतिहासिक अडचणी ओळखुन त्यावर उपाययोजना रावबल्या जात आहेत, ज्यामुळे शिक्षणचा दर्जा सुधारण्यास मदत होईल.

संशोधन विषयाची सदयस्थिती

निपुण भारत अभियानाचा उददेश 2026–27 पर्यंत प्रत्येक मुलाला इयत्ता 3 पर्यंत वाचन, लेखन आणि मुलभुत गणितातील कौशल्ये आत्मसात करणे आहे या उदिदष्टाच्या पुर्ततेसाठी विविध कृती कार्यक्रम राबवले जात आहेत.

1 निपुण कृती कार्यक्रमाची अंमलबजावणी

इयत्ता 2 री ते 5 वी च्या सर्व विद्यार्थ्यांसाठी 5 मार्च 2025 ते 30 जुन 2025 या कालावधीत विशेष कृती कार्यक्रम राबविण्यात येत आहे. या कार्यक्रमाचे उदिदष्ट आहे की, प्रत्येक वर्गातील किमान **75 %** विद्यार्थ्यी अपेक्षित अध्ययन क्षमता प्राप्त करतील.

2 शिक्षक प्रशिक्षण आणि मुल्यमापन

राज्यातील शिक्षकांना FLN संदर्भातील प्रशिक्षण देण्यात येत आहे.

3 तंत्रज्ञानाचा वापर

DIKSHA आणि इतर डिजीटल माध्यमातुन शिक्षण साहित्य उपलब्ध करून देण्यात येत आहे.

**FLN साठी राबवले जात असलेले उपक्रम**

1 शालेय मुल्यमापन

मुलांच्या वाचन, लेखन आणि आकडेमोडी कौशल्यांचे मुल्यमापन करण्यासाठी नियमीत चाचण्या घेतल्या जात आहेत.

2 सर्जनशील शिक्षण साहित्य

FLN अंतर्गत मुलांसाठी रंजक आणि सर्जनशिल शिक्षण साहित्य तयार केले जात आहे. गणित आणि भाषेसाठी कृती आधारित शिकवणुकीवर भर दिला जात आहे.

3 समावेशक शिक्षण.

शिक्षक, पालक आणि समुदायाच्या सहभागाने शिक्षण पध्दती अधिक प्रभावी बनवण्यात येत आहे.

**समारोप**

अशाप्रकारे निपुण भारत अभियान हे भारतातील प्राथमिक शिक्षण व्यवस्थेत सुधारणा घडवुन आणण्यासाठी प्रभावी उपक्रम आहे. FLN कार्यक्रमामुळे मुलांचे वाचन, लेखन आणि गणिती कौशल्ये विकसीत होण्यास मदत होणार आहे. तथापी ग्रामीण आणि दुर्गम भागात अधिक प्रयत्नांची आवशकता आहे. निपुण भारत अभियान आणि FLN उपक्रम शिक्षण क्षेत्राला एक दिशादर्शक ठरणार आहे.

**संदर्भ सुची**

1. बापट भा.गो., 1975, शैक्षणिक संशोधन, पुणे, नुतन प्रकाशन
2. भारत सरकार, 2020, राष्टीय शिक्षण धोरण 2020, नवी दिल्ली, शिक्षण मंत्रालय
3. मेहरोत्रा संतोष, 2022, Bridging the Gap, नवी दिल्ली, Oxford University press